नवराष्ट्र



# 'माझी कन्या भाग्यश्री' लाभार्थ्यांचा सत्कार

पालघर , नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. पालघर जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागामार्फत माझी कन्या भाग्यश्री योजनेमार्फत जिल्ह्यातील तीन लाभार्थ्यांचा प्रातिनिधिक स्वरूपात जिल्हा परिषद अध्यक्ष भारती कामडी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. १ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयानुसार दोन मुली झाल्यावर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या ५५ लाभार्थ्यांची जिल्ह्यातून निवड करण्यात आली आहे. मुलींचा जन्मदर वाढविणे, लिंग निवडीस प्रतिबंध करणे मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे मुलींच्या आरोग्याचा दर्जा वाढविणे यासाठी माझी कन्या भाग्यश्री ही योजना १ एप्रिल २०१६ पासून लागू करण्यात आलेली आहे. सदर योजना दारीद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबात जन्माला येणाऱ्या दोन मुलींसाठी लागू असून दारिद्र्यरेषेवरील एपीएल कुटुंबात जन्माला येणाऱ्या मुलींसाठी या योजनेतील काही लाभ देण्यात येणार आहेत.